विषय:- राज्य शासकीय कार्यालयांसाठी पाच दिवसांचा आठवडा लागू करण्यावावत....

जा.क्र.आस्था-२(३)/परिपत्रक/कावि- ७३/२०२०
सामान्य प्रशासन विभाग
सातारा जिल्हा परिषद सातारा
दिनांक - २७/०२/२०२०

**परिपत्रक**

या परिपत्रकाव्दारे कळविणेत येते की , महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासननिर्णय क्र.समय-२०१६/प्र.क्र.६२/१८(र.व.का.) दिनांक २४/०२/२०२० नुसार राज्यातील शासकीय कार्यालयांसाठी पाच दिवसांचा आठवडा लागू करण्यात आलेला असून दिनांक २९ फेब्रुवारी २०२० पासून सर्व शनिवार व रविवार हे सुट्टीचे दिवस असणार आहे. त्यामुळे शासकीय कामकाजाचे दिवस कमी होवून कामकाजाच्या तासांत वाढ झालेली आहे.

सदर परिपत्रकाव्दारे खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत असून सर्व अधिकारी/कर्मचारी यांना त्यावावत अवगत करुन निदर्शनास आणून देण्यात येवून कार्यवाही करण्यावावत आदेशीत करण्यात येत आहे .

१) सर्व शासकीय कार्यालयांच्या कामकाजाची वेळ ४५ मिनिटांनी वाढविण्यात आलेली असल्याने सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ अशी कार्यालयीन वेळ असणार आहे. त्यामुळे सर्व कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत ९.४५ पुर्वी उपस्थित राहून प्रत्यक्ष कामकाजास ९.४५ वाजता सुरुवात करणे आवश्यक राहील.

२) तसेच शिपाई या संवर्गातील कर्मचा-यांसाठी कार्यालयीन वेळ ही सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.३० अशी राहील. त्यामुळे शिपाई संवर्गातील कर्मचा-यांनी देखील ९.३० पुर्वी कार्यालयात उपस्थित राहून ९.३० वाजता प्रत्यक्ष सोपविण्यात आलेल्या कामकाजास सुरुवात करावी.

३) तसेच सर्व शासकीय कार्यालयात भोजनाची वेळ दु.१.०० ते २.०० या कालावधीत जास्तीत जास्त अर्धा तास अंतर्भुत करण्यात आलेली असल्याने जिल्हा परिषद सातारा अंतर्गत असलेल्या सर्व कार्यालयासाठी भोजनाचीवेळ दु.१.३० ते २.०० अशी निश्चित करण्यात आलेली आहे.

४) शासननिर्णयात कर्मचा-यांचे चहापानासाठी वेळ निश्चित करण्यात आलेली नाही. त्यामुळे यापुढे चहापानासाठी वेळ राखीव ठेवण्यात आलेली नाही.

५) तसेच कार्यालयीन वेळेत संबंधित सर्व कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत त्यांना सोपविण्यात आलेले कामकाज हे त्यांचेसाठी केलेल्या बैठक व्यवस्थेच्या ठिकाणी उपस्थित राहून करणे आवश्यक असून कर्मचारी त्यांचे जागेवर न आढळल्यास सदर कर्मचारी शिस्तभंग विषयक कार्यवाहीस पात्र राहील.

६) तसेच सर्व कर्मचारी यांनी त्यांचे कार्यालयीन वेळेत तसेच पंचायत समिती स्तरावरील कर्मचा-यांनी जि.प. मुख्यालयी येताना त्यांचे ओळखपत्र दर्शनी भागावर लावणे आवश्यक राहील.

७) तसेच वर्ग -४ कर्मचारी यांनी त्यांचे गणवेषात कार्यालयीन वेळेत उपस्थितराहणे आवश्यक राहील.

८) पाच दिवसांचा आठवडा शासन निर्णय दिनांक २४/०२/२०२० मधील परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेल्या कार्यालयांसाठी लागु राहणार नाही.

वरील नमूद सुचनांचे काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक असून त्यानुसार कर्मचारी यांचे वर्तन आढळून न आल्यास सदर कर्मचा-यांचे वर्तन हे गैरशिस्तीचे धरण्यात येवून त्यांचे विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील तरतुदींचा भंग असल्याचे गृहीत धरुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील तरतुदीनुसार आवश्यक व उचित कार्यवाही करण्यात येईल, यावावत गांभीर्याने नोंद घ्यावी.

(संजय भागवत)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद सातारा

प्रत :- मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत :- मा. उपाध्यक्ष, जिल्हा परिषद सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत:- मा. सभापती, विषय समिती (सर्व), जि.प.सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत:- अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सातारा यांना माहितीसाठी सादर.
प्रत:-प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जि.प.सातारा यांना माहितीसाठी सादर.
प्रत :- सर्व विभागप्रमुख , जिल्हा परिषद सातारा यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.
प्रत :- गटविकास अधिकारी,पंचायत समिती (सर्व) जि. सातारा यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.

Scanned with CamScanner